दरिद्रीनारायणाचा सेवक

# विनोबा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. पा.
दा. क्र. ६२४९



नवीन भारताचा
अभिनव क्रांतिवीर

IRBK-0106241
IRBK-0106241

लेखक : अमरेन्द्र

वाचन
६२६९

# विनोबा

२२९४२
३।१।५६

## लोक-सेवक : ३

" ज्यासि आपंगिता नाहीं ।
त्यासि धरी जो हृदयीं ।
तोचि साधु ओळखावा ।। "

अमरेन्द्र

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ....६२६९....... नों. दि ..............
वि. ...ना. वा. ... क्र. ...................



IRBK-0106241

किंमत ५० नये पैसे

वोरा अँन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

प्रकाशक :

एम. के. वोरा, वोरा अॅन्ड कं. पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

लेखक :
अमरेन्द्र


आवृत्ति :
पहिली–१९५७

पानें :
बत्तीस

किंमत :
पन्नास नये पैसे

मुद्रक :

अ. चि. रायरीकर, स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ, पुणें २.



## क्रांतिकारक विनोबा

क्रांति म्हणजे काय ?

क्रांति म्हणजे बदल.

—पण कसा ?

पहिल्यानें जी स्थिति असेल तींत एकदम, सर्वप्रकारें व मुळापासून बदल होणें म्हणजे क्रांति.

सन १८१८ सालीं पेशवाई बुडाली आणि इंग्रजांची सत्ता इथें येऊन बसली. ही सत्ता आतां इथे कायमचीच झाली. त्या फार मोठी शक्ति असलेल्या सत्तेला जागची हालवितां येणार

नाहीं. आपण तिच्याविरुद्ध कांहीं करूं शकत नाहीं. अशी लोकांची समजूत होऊन बसली. त्या स्थितींत १८५७ सालीं एकदम बदल झाला. स्वातंत्र्याच्या लढाईला तोंड लागलें. चालू स्थितीला एकदम फार मोठा धक्का बसला. क्रांति सुरू झाली.

पुढें वासुदेव बळवंतांनीं उठाव केला.

त्यानंतर लोकमान्य टिळकांनीं चळवळ सुरू केली.

मग गांधींनीं सत्याग्रहाचें शिंग फुंकलें.

हे सर्व क्रांतीचेच प्रयत्न होते. त्यांतले कांहीं यशस्वी झाले; कांहीं अपेशी ठरले. कांहींनीं हातांत शस्त्रें घेतलीं होतीं. कांहींनीं घेतलीं नव्हतीं. तरीपण हे सर्व प्रयत्न राजकीय क्रान्तीचे होते.

दुसऱ्याहि प्रकारची क्रांति असते. सामाजिक–समाजांतील स्थितिसंबंधींची, लोकांच्या आपसांतील संबंधांविषयींची. आचार्य विनोबाजी भावे हे अशा प्रकारची क्रांति करणारे आहेत. सामाजिक क्रांतिकारक आहेत.

कसली क्रांति केली त्यांनीं ?

आपल्या देशांत–हिंदुस्थानांत, भारतांत लोकांची संख्या फार मोठी आहे. फार माणसें आहेत.

माणूस म्हटला कीं त्याला जगतां आलें पाहिजे.

जगायचें म्हणजे खायला अन्न पाहिजे; तसेंच ल्यायला कपडा आणि राहायला खोपट तरी हवेंच.

हें सगळें मिळवायचें म्हणजे पैसा हवाच.

पैसा हवा तर तो कुठून तरी मिळवला पाहिजे; किंवा कोणी दिला तरी पाहिजे.

पैसा दुसऱ्या कोणाकडून तरी मिळवायचा किंवा घ्यायचा म्हणजे मालाचें उत्पादन करायला हवें. त्यासाठीं कारखाने खूप हवेत; व त्यांत सगळ्यांना काम करतां यायला हवें.

पण आपल्या देशांत कारखाने फार थोडे आहेत. आहेत तेहि लहान आहेत.

आपल्याकडे आहे मुबलक जमीन. ती कसून लोकांना पैसा मिळवतां येईल. अन्न मिळवतां येईल. त्यावर जगतां येईल.

परंतु ती जमीन तरी प्रत्येकापाशीं कुठे आहे ? कोणा-जवळ जमिनीचा एक बिघ्याचा तुकडासुद्धां नाहीं. तर कांहींच्यापाशीं लाखावारी एकर पडले आहेत.

मग ज्यांच्यापाशीं जमीन नाहीं त्यांना ती कशी मिळणार? कायद्यानें मिळेल ?—तशी शक्यता ताबडतोब तरी दिसत नाहीं. त्यांत अडचणीहि पुष्कळ. त्याला दिवसगतहि फार लागेल. मग काय दंडेली करून मिळेल ? तें शक्यहि नाहीं आणि बरोबरहि नाहीं. टिकाऊ तर मुळींच नाहीं.

म्हणजे ही चालू परिस्थिति अशीच टिकणार कीं काय? कोणाला कांहीं नक्की सांगतां येत नव्हतें. जमीन नसलेल्यांचा प्रश्न सुटत नव्हता. त्यांची उपासमार थांबत नव्हती. त्या उपासमारींतून वाढणारा असंतोषाचा राक्षस मात्र दिवसेंदिवस अक्राळविक्राळ वाढत होता.

अशा स्थितींत अचानक एक नवीन उपाय सांपडला.

## ‘ जमीन देणारा देव ’

म्हणजे त्याचें असें झालें.

आचार्य विनोबाजी भावे-आपण त्यांना साधें ‘ विनोबा ’ म्हणूं. त्यांना हें नांव गांधीजींनीं दिलेलें आहे. विनोबा हे स्वतः अतिशय साधेपणानें वागणारे आहेत. त्यांना साधेपणाच फार आवडतो. तेव्हां त्यांनाहि हें नांव आवडेल.

विनोबा हे पूर्वीं गांधींच्या आश्रमांत साबरमतीला राहात. त्यांची बाकीची हकीकत मग सांगूं. — पण एवढें लक्षांत ठेवलें तरी पुरे, कीं ते गांधींचे फार आवडते शिष्य होते. पट्टशिष्य होते. गांधींचा त्यांच्यावर कमालीचा विश्वास होता.

गांधीजींच्या सूचनेवरूनच विनोबा वर्ध्याला राहावयाला आले. तेथें तीस वर्षे राहून त्यांनीं खूप काम केलें. गांधीजींच्या मागें १९४८ सालीं त्यांनीं सेवाग्रामला सर्वोदय समाजाची स्थापना केली. या सर्वोदय समाजाचें सम्मेलन शिवरामपल्ली या गांवीं १९५१ सालांत भरावयाचें होतें. त्यासाठीं विनोबांनीं आलेंच पाहिजे असा शंकरराव देवांनीं आग्रह धरला. तेव्हां विनोबा आपल्या आश्रमांतून–पौनारहून-पायीं निघाले. तेथून हैद्राबादजवळ शिवरामपल्ली आहे–साडेतीनशें मैल म्हणजे पावणेदोनशें कोस.

शिवरामपल्लीचें संमेलन पार पडलें. त्यानंतर लगेच रामनवमी होती. तारीख १५ एप्रिल १९५१. या दिवशीं विनोबांनीं तेलंगणांत जाण्याचा आपला बेत जाहीर केला. आणि दुसऱ्या दिवशीं ते तेथून निघालेहि.

ही त्यांची पदयात्रा सुरू झाली. त्यांचे पाय नकळत एका फार मोठ्या क्रांतीच्या दिशेनें पडत होते. लोकांना त्याची कल्पना नव्हती. विनोबांनाहि पूर्ण जाणीव नसावी असें वाटतें. परंतु रामनवमीच्या दिवशीं त्यांच्या मनांत उभा राहिलेला रामच त्यांचीं पावलें रामराज्याच्या कल्पनेकडे वळवीत होता.

तेलंगण म्हणजे पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचा पूर्वेकडील प्रदेश. तेथील लोक तेलगु भाषा बोलतात. मुलुख अगदीं मागासलेला. बहुतेच वस्ती गरीब शेतकऱ्यांची. त्यांची परिस्थिति अतिशय वाईट होती. कांहीं थोड्या श्रीमंत जमीनदारांच्या हातांत बहुतेक सारी जमीन. ही जमीन कसणाराला म्हणावयाचें शेत-करी, पण तो खरा होता शेतावर राबणारा मजूर. या प्रदेशांत सुमारें आठ लाख शेतकरी आहेत. त्यांच्या इतकी दैन्यावस्था जगांत कोणाचीहि नसेल.

या तेलंगणांत त्याकाळीं मोठी भयंकर परिस्थिति होती. कम्युनिस्ट पक्षाच्या लोकांनीं तिथल्या जमीनदारांविरुद्ध या शेतकऱ्यांना उठविलें होतें–बंडच उभारलें होतें म्हणाना.

त्यांच्याजवळ शस्त्रें होतीं. काळजांत बेडरपणा होता. त्यांनीं धाकदपटशानें जमीनदारांच्या जमिनी हिसकावून घेतल्या. त्या जमीन नसलेल्यांना द्यायला सुरुवात केली. या गडबडींत अनेक जमीनदारांचे खून पडले. खूप रक्तपात झाला. कित्येक गांवांवर कम्युनिस्टांचेंच राज्य सुरू झालें.

मग सरकारनें हात उगारले. पोलीस कम्युनिस्टांच्या बंदोबस्तासाठीं पुढें सरसावले. त्यांनीं माहिती-चौकशीकरितां गरीब गांवकऱ्यांचा छळ आरंभला. लोक कैचींत सांपडले. रात्रीं कम्युनिस्टांचा धाकदपटशा-अन्नाकरितां, मदतीकरितां, माहिती न देण्याकरितां. दिवसां आपल्याच सरकारच्या पोलिसांकडून छळ—माहिती देण्याकरितां, कम्युनिस्टांना मदत न करण्याकरितां. यांतून कांहीं मार्ग निघेना. लोक अगदीं हवालदील होऊन गेले.

गांधीजींचे शिष्य विनोबा याबद्दल मागपासूनच विचार करीत होते.—आतां त्याबद्दल प्रत्यक्ष कृति—काय काय करतां येईल हें त्यांना पाहायचें होतें.

ते चालत-पाहात-विचार करीत सूर्यपेठ या ठिकाणीं आले. ' हा झगडा पोलीस व लष्कर यांच्या ताकदीनें मिटण्यासारखा नाहीं. इथली जमिनीची वांटणी न्यायाची नाहीं हें उघड आहे. पण तो अन्याय नाहींसा करायचा तर शांततेचाच रस्ता धरला पाहिजे, हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. ' विनोबांच्या मनांतले त्या दिवशींचे हे विचार होते. त्यांनीं ते उघड बोलूनहि दाखविले.

पदयात्रा सुरू झाल्याच्या तिसरे दिवशीं ते पोचमपल्ली या गांवीं आले. सकाळ झाली होती. सातशें घरट्यांच्या त्या गांवांत अंदाजें ३००० माणूस राहात होतें. विनोबांनीं आल्या-आल्याच गांवच्या हरिजनांच्या रहाळांत चक्कर टाकली. हरिजन त्या दाढीवाल्या साधुबुवापाशीं जमले. कण्हून त्यांनीं आपलें गाऱ्हाणें त्यांच्यापुढें मांडलें. विनोबांना त्यांची कणव आली. विचारलें, " काय करूं बाबानो तुमच्यासाठीं ? "

" आम्हांला जमीन द्या थोडी–करूं आणि जगूं." उत्तर आलें.

" किती हवी ? "

" ऐंशी एकर पुरे होईल. " अडखळत, अंदाजत कांहींनीं सांगितलें.

तसा लेखी अर्ज विनोबांनीं मागितला. अर्ज मागितला खरा, पण विनोबा सरकारी अधिकारी थोडेच होते ! आणि त्यांना हें काम सरकारी हातांनीं होईल, इतक्या झटपट होईल असें वाटतहि नव्हतें. हैद्राबाद सरकारनें जमीनविषयक कायदा केला होता. त्यांतून काय हातीं लागलें, तें ते पाहातच होते. त्यानें गुंतागुंत मात्र अधिक वाढली होती. ' मग उपाय काय ? '

" विवेकामध्यें सांपडेना । ऐसें तों कांहींच असेना ।।–" असें श्रीरामदासस्वामींनीं म्हटलें आहे. विनोबा तर विवेकाला सरावलेलेच. विवेक म्हणजे खोल विचार. असा विचार करतां करतां कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर हें मिळालेंच पाहिजे. कसल्याहि अडचणीवर उपाय हा सांपडलाच पाहिजे. आणि तसा तो सांपडलाहि.

" इथे कोणी स्वत:ची जमीन असलेला आहे काय ? " विनोबांनीं विचारलें.

" आहे. "

" मग तुम्हांला आपसांतच कांहीं विचार नाहीं करतां येणार ? "

"—इथला कोणी जमीन-मालक जमिनीचें दान नाहीं देणार ? जमिनीचें दान–भूदान. "

दान ! हिंदु मनाला सहज सुचणारी कल्पना. हिंदु मनाला चटकन समजणारी भावना. हिंदु मनाला लगेच पटणारी सूचना. दानाची तर आपली परंपरा. हरिश्चंद्र राजानें साऱ्या राज्याचें दान दिलें. कर्णानें तर अंगचीं कवचकुंडलेंच काढून मागणाराच्या हातावर ठेवलीं.



भू म्हणजे जमीन. त्या जमिनीचें दान करावयाचें. आपण होऊन, आनंदानें, कसलाहि लोभ न ठेवतां जें द्यायचें तें दान.

रेड्डी नांवाचे एक गृहस्थ तिथे होते. त्यांच्याजवळ स्वतःची जमीन होती. त्याच्या मनांत देव उभा राहिला. रामनवमीला विनोबांना प्रेरणा करणारा राम उभा राहिला. तो रेड्डीच्या तोंडानें म्हणाला, " महाराज, माझ्या वडलांची इच्छा होती, कीं या लोकांना कांहीं जमीन द्यावी. मी माझ्या व माझ्या भावांच्या तर्फे या लोकांना शंभर एकर जमीन दान करायला तयार आहें. "

हाच भूदान-नदीचा छोटासा उगम. हेंच भूदान-क्रांतीचें पहिलें पाऊल. हीच भूदान-यज्ञाची पहिली ठिणगी.

या लहानशा उगमाचीच आतां महानदी झाली आहे. या पहिल्या पावलानें आतां सारा देश व्यापला आहे. या यज्ञाच्या ज्वाला आतां जगभर प्रकाशत आहेत.

हें घडवून आणणारे विनोबा. तेलंगणांत लोक त्यांना म्हणूं लागले—' जमीन देणारा देव. '

## ' कांहींतरी ' करण्याची तळमळ

विनायक नरहर भावे—म्हणजेच विनोबा—हे तुमच्या-आमच्यासारखेच एक माणूस. या माणसाला मोठेपण कसें आलें तें आतां आपल्याला पाहायचें आहे. हा लहानपणींचा एक सामान्य मुलगा मोठेपणीं फार मोठा माणूस कसा बनला हें आपल्याला बघायचें आहे.

विनोबांचें मूळ नांव विनायक. नरहर हें त्यांच्या वडिलांचें नांव. ते असत बडोद्याला. एका गिरणींत कापड विणण्याच्या शास्त्राचे माहितगार म्हणून काम करीत. त्यांना गणित विषयाची भारी आवड. आणि तें त्यांना चांगलें समजेहि. हा वडिलांचा गुण पुढें विनोबांतहि उतरला. वडिलांनींच त्यांना गणित शिकवलें. संशोधक स्वभावहि त्यांना वडिलांपासूनच मिळाला.

पण विनोबांच्या चरित्रांत त्यांच्या वडिलांपेक्षां आईलाच जास्त महत्त्व आहे. तिचें नांव रुक्मिणीबाई. त्या शाळाकॉलेजांत शिकलेल्या नव्हत्या. पण शिक्षणानें जें खरें साधायचें तें त्यांच्या ठिकाणीं अंगचेंच होतें. आपल्यापुरताच फक्त विचार न करतां इतरांचाहि विचार करावा. इतरांच्या सुखदु:खाची कांहीं काळजी करावी. असें माणसाला वाटणें हें शिक्षणाचें फळ. रुक्मिणीबाईंना तसें वाटत होतें; म्हणूनच विनायकानें संसारांत न पडण्याचें ठरविलें, तेव्हां त्याला त्यांनीं आशीर्वाद दिला. त्या त्याला म्हणत ' विन्या. '

हा ' विन्या ' १८९५ सालच्या सप्टेंबर महिन्यांत ११ तारखेला जन्माला आला. तें गांव कुलाबा जिल्ह्यांतलें गागोदें. यांना भाऊ दोन—बाळकोबा व शिवाजी.

विनायकाचें लहानपण बहुतेक गागोदें व पुढें वांई या गांवीं गेलें. तेथें ते आपल्या आजोबांपाशीं असत. त्यांचें नांव शंभुराव. हे तर एक देवमाणूसच होते. त्यांना देवाची भक्ति होती. माणसांची प्रीति होती. या दोन्ही गोष्टी आजोबांनीं

नातवंडांना तेव्हांच दिल्या. विनायकच्या हृदयांत त्या चांगल्या मुरल्या. नव्हे, मुरून उरल्या आणि इतरांना देण्याइतक्या पुरल्या.

१९०५ सालापर्यंत ते आपल्या आजोळींच होते. पुढें वडिलांनीं त्यांना बडोद्याला आणलें. सुरुवातीला ते शाळेंतला अभ्यास मन लावून करीत. पुढें त्यांना इतर वाचनाचें वेड लागलें. हें वेडच लागलें नाहीं तर काय! कारण गडी एकदां वाचायला लागला म्हणजे दुसऱ्या कशाचेंच भान त्याला नसायचें. आणि पुस्तकांतला जो भाग आवडेल तो पुन्हां पुन्हां एकदां, दोनदां दहादां वाचीत राहायचा आणि त्यामुळें तो पाठहि होऊन जायचा. त्यांच्या वाचनाचा दुसरा विशेष म्हणजे जीं जीं म्हणून जप्त पुस्तकें असतील ती हरप्रयत्नानें मिळवून वाचायचीं. ज्या वर्तमानपत्रांवर सरकारची बंदी असेल तीं हटकून आणून वाचून काढायचीं. स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं लिहिलेलें 'मॅझिनी-चरित्र' यांचें फार आवडलें. हा मॅझिनी इटली देशाचा थोर नेता होऊन गेला. यानेंच इटलीला स्वातंत्र्य मिळवून दिलें. थोर क्रांतिकारक म्हणून त्याचें नांव घेतात. सावरकरांच्या मॅझिनीप्रमाणेंच लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' वर यांची मोठी भक्ति.

हें वाचन चाललें होतें आणि शाळेंतलें शिक्षण पण चालू होतें. शाळा संपली आणि ते कॉलेजांत गेले. बी.ए. च्या परीक्षेचा अभ्यास चालू झाला. त्यांचें शरीर कॉलेजांत जात होतें. डोळे अभ्यासाचीं पुस्तकें वाचीत होते. पण त्यांचें मन शिकायला राजी नव्हतें. 'काय मिळणार आहे या शिक्षणानें ?' या प्रश्नाचें उत्तर समाधानकारक मिळत नव्हतें. मॅझिनीनें इटालींत जें केलें. टिळकांनीं हिंदुस्थानांत जें केलें. तसें कांहीं करायची शक्ति या शिक्षणांतून मिळेल ? तसें त्यांचें मन त्यांना सांगेना. असें कांहीं या शिक्षणांतून घडेल हें पटेना.

आणि जें मनाला पटत नाहीं, स्वत:ला वाटत नाहीं; तें इतर करतात म्हणून करीत राहायचें हें कोणता तेजस्वी माणूस पत्करील ? विनोबांना तर तें मुळींच

सहन झालें नाहीं. त्यांनीं ठरविलें–' कॉलेज सोडायचें. ' लगेच पूर्वीचे शाळा कॉलेजचे दाखले–सर्टिफिकिटें चुलींत टाकून दिलीं. आईनें विचारलें " विन्या, पुढें कधीं लागलीं तर ? " पण, 'विन्या'चा निश्चय ठाम झालेला होता. त्याला विचाराचें पाठबळ होतें. आलें डोक्यांत–गेले झोकांत ! असा उतावळेपणाहि नव्हता त्यांत. त्यांनीं लगेच सांगून टाकलें, "आई, त्याची गरज आतां कधींच नाहीं लागायची. माझें हें ठरलें आहे." ज्याच्यासाठीं जिवाचा आटापिटा करून अभ्यास करायचा, परीक्षा पास व्हायच्या. आणि ज्याच्या जोरावर मोठ्या पगाराची नोकरी नि मानाची जागा मिळवायची. तीं सर्टिफिकिटें सहज चुलीत फेंकायचीं. याला मनाची मोठी तयारी लागते. जुना फाटका निरुपयोगी झालेला अंगरखा कचऱ्याच्या पेटींत टाकायचा तरी आमच्या कोण जिवावर येतें !

कॉलेज संपलें !–पण आतां पुढें काय ? खूप वाचलेलें होतें. पण प्रत्यक्ष पाहिलेलें फारसें नव्हतें. केलेलें तर कांहींच नव्हतें. देशासाठीं ' कांहींतरी ' करायचें तर त्याकरितां त्याग केला पाहिजे एवढें कळत होतें. प्रामाणिकपणानें, वाटेल तो, सर्व प्रकारचा त्याग करायची तयारीहि होती. पण 'कांहींतरी' म्हणजे काय करायचें ?

या 'कांहींतरी' करण्यासाठीं त्याग करायला पाहिजे; सगळ्याचा त्याग करायला पाहिजे. आणि त्यासाठीं घरहि सोडलें पाहिजे. एवढें मात्र विनोबांना पटलें होतें. आणि जें पटलें तें ठरलेंच. आणि पटल्यावर मग अमलांत यायला काय उशीर ? ' विचार तसा उच्चार, आणि उच्चार तसा आचार.' हें तर विनोबांच्या जीवनाचें सूत्र आहे. पहिल्यापासूनच त्यांचें आयुष्य या बळकट धाग्यांत ओवलें गेलें आहे. हेंहि एक तप आहे. तपानें शुद्धि होते. तपानें शक्तिहि वाढते.

विनोबा उठले आणि काशीला निघून गेले. घर सोडलें.

पण सोडण्यापूर्वीं कोणाला थांगपत्ता लागूं दिला नाहीं. उशिरां हातीं पडेल असें पत्र मित्रांच्या हातीं वडिलांसाठीं दिलें.


**३**

## साधक विनोबा

काशीला जातांना ' मी ब्रह्म जाणून घेण्यासाठीं जातों ' म्हणून ते मित्रांना म्हणाले. त्याप्रमाणें कांहीं दिवस त्यांनीं तिथें चिंतनांत घालविलेसुद्धां. कदाचित त्यावेळीं त्यांच्या मनांत डोळ्यांना प्रत्यक्ष न दिसणा–भासणारा देव जाणून घेण्याची इच्छा असेल. परंतु प्रत्यक्षांत त्यांना भेटला तो मात्र चालता–बोलता देव. जसा तुकाराम महाराजांना पंढरीच्या पांडुरंगांत सगुण साकार देव भेटला तसा. –आणि तोहि अगदीं थोड्या काळांत–तीन एक महिन्यांत.

त्यावेळीं गांधीजींचें नांव फारसें पुढें आलेलें नव्हतें. नामदार गोखल्यांसारखीं कांहीं माणसें त्यांची योग्यता ओळखून होतीं. विनोबा काशीला असतांनाच गांधीजींचें तिथें येणें घडलें. काशी म्हणजे बनारस. हें इंग्रजांच्या काळांत पडलेलें नांव. आतां त्या शहराचें नांव झालें आहे वाराणसी. या बनारसला पंडित मालवीयांनीं स्थापलेलें ' हिंदु विद्यापीठ ' आहे. त्या ठिकाणीं गांधीजींचें व्याख्यान झालें. या व्याख्यानाचा परिणाम विनोबांच्या मनावर फार झाला–खोल आणि मोठा झाला.

त्यावेळपर्यंत तरी विनोबा मनानें शस्त्राचारी क्रांतिकारक होते. त्यांचें मन देशाच्या राजकीय विचारांनींच मुख्यतः भरलेलें असे. आणि देशसेवेसाठीं शस्त्राचारी क्रांतिकारकांनीं पत्करलेला मार्ग आपण पत्करावा अशा ते विचारांत होते. काशीला आल्यानंतर तेथें त्यांचा अशा विचाराच्या कांहीं मंडळींशीं संबंधहि आला होता. परंतु आपल्या स्वभावाला तो रस्ता मानवणारा नाहीं, असेंहि त्यांना वाटूं लागलें होतें. अशा परिस्थितींत त्यांनीं गांधींचें व्याख्यान ऐकलें. त्यांना त्या व्याख्यानांतले



विचार कांहीं निराळे, वेगळे वाटले. त्या 'विचारां'बद्दल आपण विचार करावा असें त्यांच्या मनांत आलें. लगेच त्यांनीं गांधींना त्याविषयीं पत्रहि लिहिलें. एक–दोन–तीन पत्रें गेलीं व त्यांचीं उत्तरेंहि गांधींकडून मिळालीं. पण पुढें ' यापेक्षां तुम्ही समक्षच येऊन भेटा ' असें गांधींनीं त्यांना लिहिलें. लगेच विनोबा गांधींकडे निघून आले. त्यावेळीं गांधींनी कोचरब येथें आपला आश्रम नुकताच सुरू केला होता.

विनोबा गांधींच्या आश्रमांत आले. आणि गांधींचेच होऊन गेले. तेथें त्यांना असें काय मिळालें म्हणून ते राहिले ? त्याबद्दल स्वत: विनोबांनींच एकदां भाषणांत सांगितलें आहे: " आश्रमांत येऊन मला काय मिळालें हें माझें मलाच माहीत. कांहींतरी अत्याचारी कामगिरी करून देशाच्या कामीं यावें

आणि आपला प्रभाव दाखवावा अशी लहानपणची माझी महत्त्वाकांक्षा होती. परंतु बापूंमुळें त्या महत्त्वाकांक्षेच्या तडाख्यांतून मी सुटलों. माझ्या ठिकाणचा संतापाचा व इतर विकारांचा ज्वालामुखी विझविला तो त्यांनींच. ''

विनोबा आश्रमांत येऊन राहिले; नव्हे विनायक भावे हे आश्रमांत येऊन राहिले.—कारण 'विनोबा' हा शब्द गांधींनीं त्यांच्या वडिलांना पत्र लिहिलें त्यांत पहिल्यानें वापरला आहे. हा फटिंग तरुण आईबापांना न कळवितांच घराबाहेर पडलेला आहे. त्यानंतरहि आपण कोठें आहोंत वगैरे त्यानें घरीं कळविलेलें नाहीं. हें गांधींना समजतांच त्यांनीं नरहरपंतांना बडोद्याला एक पत्र लिहिलें. " तुमचा विनोबा मजपाशीं आहे. तुमच्या चिरंजिवांच्या अंगीं इतक्या कोवळ्या वयांत केवढी समाधानी व आनंदी वृत्ति ठसावली आहे आणि केवढें वैराग्य बाणलें आहे ! एवढी कमाई करायला मला पुष्कळ वर्षें कष्ट करायला लागले आहेत. ''—यावेळीं विनोबा अवघे २१ वर्षांचे तरुण होते.

विनोबा आश्रमांतील एकंदर राहणीशीं सहज एकरूप होऊन गेले. रस्ते झाडण्यापासून स्वयंपाक करण्यापर्यंत कोणत्याहि आश्रमीय सेवेला ते मागें सरले नाहींत. त्यांनीं तिथें शिकवण्याचें काम चालू केलें. गांधींच्या व त्यांच्या हृदयाचा मेळ झाला. विनोबांना हवें होतें तसें वातावरण तेथें लाभलें. पाहिजे होता तसा वाटाड्या मिळाला. गांधींना तर उत्तम अनुयायी आल्याचा आनंद वाटला. त्यांनीं विनोबांचें वर्णन केलें आहे : " आश्रमांत जीं कांहीं थोडीं रत्नें आहेत त्यांपैकीं विनोबा हें एक. ते इतरांप्रमाणें आश्रमाकडून आशीर्वाद मिळवायला येत नसून आशीर्वाद द्यायला येत असतात; आणि कांहीं घेण्यासाठीं नव्हे तर देण्यासाठीं राहात असतात. '' विनोबा आश्रमांत आल्यानंतर लगेच १९१७ सालची ही गोष्ट आहे. दीनबंधु अँड्रुज आश्रमांत आले होते त्यावेळीं गांधीजींनीं त्यांना विनोबांची अशी ओळख करून दिलेली होती.

तरुण माणसाची भलतीच स्तुति करूं नये हें काय गांधीजींना समजत नव्हतें ? परंतु विनोबांच्या वाऱ्याला अहंकार–गर्व उभा राहात नाहीं हें त्यांनीं केव्हांच ओळखलें होतें. आणि वयावर तरी काय आहे ? एकवीस वर्षांत ज्ञानेश्वर महाराजांनीं आयुष्यांत जें काय साधायचें तें सारें साधून घेतलें. समाजासाठीं जें कांहीं द्यायचें तें ते देऊन चुकले. आणि आयुष्याला खरी सुरुवात व्हायची तेव्हां त्यांनीं तें संपवलेंहि. आश्रम विनोबांच्या मनाला मानवला खरा, पण शरिराला मात्र मानवला नाहीं. म्हणून त्यांनीं तिथून वर्षभर दुसरीकडे जाऊन राहायचें ठरविलें. गांधीजींच्या परवानगीनें ते वांईला आले. वांईच्या प्राज्ञपाठशाळेंत संस्कृत ग्रंथांचा चांगला अभ्यास केला. आणि आश्रम सोडल्या वेळेपासून बरोबर वर्षानंतर जवळ जवळ त्याच वेळीं ते आश्रमांत परत येऊन दाखल झाले.

या वर्षभरांत त्यांनीं वांईला काय केलें ? वांईला विश्रांति घेत, आराम करीत, ते स्वस्थ बसतील हें शक्यच नव्हतें. विनोबांच्या स्वभावांतच तें नाहीं. कारण विनोबा म्हणजे वेग. विनोबा म्हणजे गति. विनोबा म्हणजे प्रगति. " अखंड वाढ " हा विनोबांच्या स्वभावांतला विशेष म्हणून महादेवभाई देसायांनींहि सांगितला आहे. वर्षभर वांईला त्यांनीं काय केलें हें वेगळें सांगायला नको. विनोबांनीं गांधीजींना पाठविलेल्या पत्रांत तें त्यांनीं स्वतःच लिहिलें आहे. तें थोडक्यांत पाहूं म्हणजें झालें :

आपली तब्बेत सुधारण्याकरितां म्हणून ते आश्रम सोडून वांईला आले होते. त्यांनीं तिथें आल्यापासून रोज १०–१२ मैल फिरायला जाण्याचा तडाखा सुरू केला. त्यानंतर ६ ते ८ शेर धान्य दळण्याचा व्यायाम ते करूं लागले. पुढें रोज ३०० नमस्कार व फिरणें चालू ठेवलें. यानें तब्बेत अर्थातच सुधारली. चांगली झाली. खाण्यापिण्याच्या बाबतींतहि ते मोठे कडक होते. पहिले सहा महिने ते जेवणांत मीठ खात असत. पुढें तें खाणें बंद केलें. मसाल्यांना तर ते शिवलेच नाहींत. आणि पुढें जन्मांत कधींहि

मसाले न खाण्याचा नियम त्यांनी करून टाकला. ते दूध पीत; परंतु दुधाशिवाय आपलें काम चालूं शकेल किंवा नाहीं याचेहि प्रयोग करून पाहात. महिनाभर तर त्यांनीं फक्त केळीं, दूध व लिंबू या तीन पदार्थांवर काढला. पुढें त्याच्या जोडीला ज्वारीच्या भाकरी आल्या. पण तेंहि अगदीं मोजून मापून. कारण गणिती विनोबांपाशीं 'अंदाजपंचे' हा शब्दच नाहीं. दूध ६० तोळे, भाकरीची ज्वारी २० तोळे, चार किंवा पांच केळीं आणि लिंबें. या सगळ्या अन्नाचा त्यावेळचा ( १९१८ साल–या वेळीं दुसरें महायुद्ध संपलें होतें. महागाई वाढलेली होती. ) खर्च होता रोजचा पावणेतीन आणे. पण हें जेवणहि 'सरदारी-श्रीमंती' आहे असें विनोबांना वाटायचें. ही भाकरीहि स्वतःच्या हातांनीं बनवून खायची त्यांची धडपड. फक्त प्रवासांत तें जमत नसे.

आपण गांधीजींच्या आश्रमांतले आहोंत. तिथून वांईला 'रजेवर' आलों आहोंत. हें विनोबा विसरले नव्हते. त्यामुळें पोलीस शिपाई जसा 'चोवीस तास कामावर' असतो तसे ते तिथेंहि आपल्याला आश्रमाचे रहिवासी समजत. त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत. आश्रमाचे नियम कांटेकोरपणानें पाळण्याची शिकस्त करीत.

आश्रमाच्या नियमांत अस्वाद–म्हणजे खाण्यापिण्यांत चवढव न ठेवणें हा पहिला. परंतु चवीसाठीं कांहीं खाण्याची –मसालेदार चमचमीत खाण्याची–इच्छाच विनोबांना होत नाहीं. त्यांनीं जिभेवर ताबा केव्हांच मिळविला आहे. या गोष्टीचें महत्त्व फार मोठें आहे.

" ज्यानें जिंकिली रसना। तृप्त जयाची वासना। तो योगी गा॥ "

असें श्रीरामदासस्वामींनीं म्हटलें आहे. तसा योग तर विनोबांनी केव्हांपासूनच साधला होता.

दुसरा नियम–अपरिग्रह. म्हणजे स्वतःच्या उपयोगासाठीं स्वतःजवळ कांहीं सामान न जमविणें.

"पक्षियाचे घरीं, नाहीं सामगरी। त्याची चिंता करी नारायण।"

असें तुकाराम महाराजांनीं सांगितलें आहे. चिमणी-कावळ्यांच्या घरट्यांत बेगमीचीं पोतीं थोडींच भरून ठेवलेलीं असतात ! ती स्थितीहि या २०-२२ वर्षांच्या तरुण साधकानें अंगीं बाणविली होती. एक लांकडी थाळी व वाटी, एक लोटा, धोतर व घोंगडी हेंच सामान. एक धोतर नेसायला, एक पांघरायला. सर्व कपडे हातमागाचे. पुस्तकें मात्र ते स्वत:जवळ बाळगीत. संन्याश्याची राहणी यापेक्षां काय वेगळी असते ? पण नुसता बाह्य वेष नाहीं. आंतून मनांतून व प्रत्यक्षांत वागणें तसेंच स्वच्छ, निर्लेप. सत्य–खरें बोलणें. अहिंसा–कसल्याहि प्रकारें हिंसा न करणें. ब्रह्मचर्य-संसारापासून दूर राहणें. हे सारे नियम तर विनोबा नेहमींच पाळीत आले होते. वयाच्या दहाव्या वर्षींच त्यांनीं ब्रह्मचारी राहून देशाची सेवा करण्याची शपथ घेतली होती.

स्वदेशी वापरणें हा आश्रमाचा आणखी एक नियम होता. परंतु परदेशी वस्तूंशीं विनोबांचा कधीं संबंध येईल तेव्हां ना !

स्वत:चें जेवण स्वत: बनवून खावें अशी आश्रमाची अपेक्षा; पण प्रवासांत तें जमत नाहीं, हा आपला कमीपणा त्यांना वाटे. आणि त्यांनीं गांधींजींना लिहिलेल्या पत्रांत तो 'कमीपण' लिहूनहि टाकला होता.

वांईच्या पाठशाळेंत नारायणशास्त्री मराठे यांच्यापाशीं त्यांनीं खूप अभ्यास केला. गीता वगैरे आपले थोर ग्रंथ वाचले. चांगले समजून घेतले. या काळांत ते इतके शिकले कीं अधिक शिकण्याचा मोह त्यांना उरला नाहीं.

पण नुसतें वाचून काय होतें ? नुसतें शिकून काय समजतें? नुसत्या वाचनानें कोरडा अहंपणा–गर्व उत्पन्न होतो. नुसतें शिकत राहिल्यानें दुसऱ्याला उत्तर देऊन गप्प कसें करावें हें समजतें; वाद कसा घालावा हें कळतें. परंतु––

" दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें "

हें खरें साधायला हवें असतें. पण त्यासाठीं पुस्तकें आणि त्यांची घोकंपट्टी नुसती उपयोगी पडत नाहीं. " हातानें काम करतां करतां शिक्षण घेतलें पाहिजे " असें एका मोठ्या माणसानें म्हटलें आहे. विनोबा वांईला ही गोष्ट स्वतः करून दाखवीत होते. त्यांनीं तिथें वर्षभरांत काय काय केलें त्यांची ही यादीच आहे. त्यांच्याच पत्रांत त्यांनीं दिलेली :

१. सहा विद्यार्थ्यांना सर्व गीता मोफत शिकविली. २. ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय चार विद्यार्थ्यांना शिकविले. ३. नऊ उपनिषदें दोन विद्यार्थ्यांना शिकविलीं. ४. हिंदी वर्तमानपत्रें वाचण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांत सुरू केला. ५. दोन विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकविली. ६. ऐतिहासिक ठिकाणांची चारशें मैल पायीं सफर केली; प्रसिद्ध किल्ले पाहिले. ७. प्रवासांत गीतेवर पन्नास प्रवचनें दिलीं. ८. ' विद्यार्थी मंडळ ' स्थापन केलें. त्यातर्फे वाचनालय व दळण-वळण वर्ग सुरू केला. ( त्यांत इतर पंधरा विद्यार्थ्यांसह स्वतः विनोबा दळीत असत. ) या दळणांतून शेराला दोन पैसे याप्रमाणें रक्कम जमवून वाचनालयांत चारशें पुस्तकें आणलीं. ९. सत्याग्रहाश्रमाच्या तत्त्वाचा प्रचार केला. इत्यादि.

यांत सेवा होती. शिक्षणहि होतें. आणि वर्षभर अशा प्रकारें शिकणें-शिकवणें चालू होतें. तरी विनोबा मूळ मुद्दा विसरलेले नव्हते. हें सर्व लोकांच्या सेवेसाठीं आहे, देशाच्या सेवेकरितां आहे, याची त्यांना पुरी आठवण होती. त्यांनीं गांधींना याच पत्रांत लिहिलें आहे–" सत्याग्रह किंवा तसलीच दुसरी कांहीं जरूर उत्पन्न झाली तर मी टाकोटाक येईन; नाहींतर पाडव्याला ठेवलेलींच. " वांईहून गांधींजींना लिहिलेल्या या प्रसिद्ध पत्राचा शेवट विनोबांनीं असा केला आहे–"आपण स्वतः मला पत्र लिहावें. मी आपल्याला वडिलांच्या ठिकाणीं मानतों. स्वतःला आपला मुलगा समजतों. हा मुलाचाच आग्रह समजा."

पत्र वाचून गांधीजी गहिंवरले. त्यांना धन्य धन्य वाटलें. विनोबांचा कोणत्या शब्दांनीं गौरव करावा त्यांना समजेना. आपल्याला वडिलांच्या ठिकाणीं मानणारा हा मुलगा ‘ बापसे बेटा सवाई’ ठरला,असें त्यांच्या मनांत आलें.ते म्हणाले, “गोरखानें मच्छिंद्रनाथाला हरवलें ! खरोखर भीम आहे भीम ! ”

गांधीजींनीं विनोबांच्या पत्राला लगेच उत्तर लिहिलें : “ तुझें प्रेम व तुझी वागणूक यांनीं मी मोहून गेलों आहें. तुला कसोटीला लावायची शक्ति माझ्यांत नाहीं. . . . तूं मला जी वडिलांची जागा दिलीस ती मी प्रेमाची भेट म्हणून स्वीकारतों. . . . देव तुला उदंड आयुष्य देवो. तूं देशाच्या कारणीं लागोस. देशाच्या भल्यासाठीं तुझा उपयोग व्हावा हीच माझी इच्छा. ”

ठरल्याप्रमाणें पाडव्याला विनोबाजी आश्रमांत हजर झाले. गांधीजींचा आशीर्वाद व इच्छा फळाला कशी येईल याची काळजी आतां देवालाच लागली.

## सेवक विनोबा

आतां सेवेला सुरुवात झाली. आणि योगायोग असा कीं ती प्रथम स्वतःच्या घरांतूनच झाली. ‘परोपकाराचा प्रारंभ पहिल्यानें घरूनच होतो ’ अशी इंग्रजी भाषेंत म्हण आहे. तसेंच हें घडलें—योगायोगानें. हा योगायोग विचित्र होता–वाईट होता, दुःख देणारा होता. तसाच दुसऱ्या अर्थानें चांगला होता, समाधान आणणाराहि होता.

तापसरीची (फ्ल्यू) भयंकर साथ देशभर पसरली होती. माणसें पटापट मरत होतीं. या साथीनें बडोद्याला विनोबांचें घरहि सोडलें नाहीं. आई, वडील, भाऊ सर्वच आजारी. तेव्हां गांधीजींच्या आग्रहावरून ते आजाऱ्यांच्या सेवाशुश्रूषेसाठीं घरीं आले. त्यांत भाऊ गेला, आई वारली. विनोबांच्या तीन

गोष्टी विशेष प्रेमाच्या, पूजेच्या–माता, गीता व गांधी. यांपैकीं मातेच्या मरणाचें त्यांना दुःख फार झालें. परंतु ते गीता घेऊन बसले. गीतेनेंच त्यांचें सांत्वन केलें. ते म्हणतात : "मला गीतेचा अर्थ थोडाबहुत समजूं लागला आणि त्यानंतर आई गेली ; –म्हणजे ती मला गीतेच्या ओटींत घालून गेली. आई गीते, तुझ्याच दुधावर मी आजपर्यंत पोसलों आणि पुढेंहि आधार तुझाच आहे." संस्कृत गीतेचा मराठींत अर्थ विनोबांनीं लिहिला. त्या पुस्तकाला त्यांनीं नांव दिलें 'गीताई.' गीता+आई ; म्हणजे गीता हीच आई.


**" गीताई माउली माझी, तिचा मी नेणता बाळ ।**
**पडतां रडतां घेई उचलोनी कडेवर ॥ "**

विनोबांना खरोखरच असा अनुभव आला असला पाहिजे. अनुभवाशिवाय उगाच ते कधींच लिहिणार नाहींत. केवढा थोर अनुभव ! थोरांचें सारेंच थोर!

विनोबा पुन्हां आश्रमांत परतले. साबरमतीच्या आश्रमांत त्यांनीं चरखा आणि खादीचें शास्त्र यांत लक्ष घातलें. सूत कातणें. विणणें यांत त्यांचा संशोधक स्वभाव काम करूं लागला. त्यांचें गणिती डोकें नवे नवे प्रयोग करूं लागलें.

आश्रमांतले कार्यक्रम चालू होते. तरी देशांतल्या घडामोडींकडे त्यांचें दुर्लक्ष नव्हतें. मात्र त्यांना स्वराज्य मिळविण्यासाठीं झटपट कांहीं करतां येईल असें दिसेना. ते त्याबद्दल खूप विचार करीत होते. त्यांची खात्री झाली कीं सबंध नवीन पिढी तयार व्हायला हवी. देशसेवेची निष्ठा त्यांच्यांत पुरेपूर बाणायला हवी. आणि त्याबरोबर सेवेच्या फळाची इच्छा त्यांच्या मनांतून पार नाहींशी झालेली असायला हवी.

गांधीजींचे प्रयोग आपल्यापरी चालूच होते. विनोबाजी ते पाहात होते. स्वतःहि स्वतंत्रपणें विचार करीत होते. विनोबांना तसे स्वतंत्र प्रयोग करून पाहण्याची संधि लवकरच आली. १९२१ सालच्या पाडव्याला ते वर्ध्याला गेले. तेथें शेठ



जमनालाल बजाज यांच्या मनांतून एक सत्याग्रहाश्रम चालवावयाचा होता. त्यासाठीं गांधीजींनीं विनोबांना देऊन टाकलें. आणि तेव्हांपासून १९५१पर्यंत सतत तीस वर्षें विनोबा त्या भागांत नवे नवे प्रयोग करीत बसले होते. वर्धा-सेवाग्राम ही त्यांची प्रयोगशाळाच बनली. शरीरकष्टाचे प्रयोग, मनाच्या संयमाचे प्रयोग, चरखा-टकळीचे प्रयोग. असे कितीतरी. आत्म्याचे प्रयोग त्यांच्या स्वतःच्या ठिकाणीं चालू होते. तर सेवाग्रामांत लोकसेवेचे प्रयोग चालत होते. खादी, ग्रामोद्योग, नई तालीम गांवसफाई या सर्व गोष्टी त्यांत होत्या. गांधीजींचें रचनात्मक कार्य प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याची ती योजना होती. यांत साधना होती. म्हणजे स्वतःचा विकास, प्रगति ते साधीत होते.





आणि सेवाहि होतीच. लोकांचीहि उन्नति ते करीत, करवीत होते. पुष्कळ तरुण मंडळी त्यांच्या भोंवतीं तिथें जमली. नवीन नवीन सारखी येतहि होती. त्यांची स्वतःची अशी सेवकांची सेना तिथें तयार होत होती.

वर्ध्याला येऊन विनोबांना बारा वर्षें पूर्ण झालीं. संस्कृत भाषेंत बारा वर्षें म्हणजे एक तप. तें तप पुरें झालें. तेव्हां विनोबांनीं आणखी एक नवें तप सुरू करण्याचें ठरविलें. तशी परवानगी त्यांनीं गांधीजीपाशीं मागितली. त्या पत्रांत विनोबा गांधीजींना लिहितात:

> " ... वर्ध्याचा आश्रम स्थापन होऊन बारा वर्षें झालीं एक सत्र संपलें. अनुभव चांगला आला. कर्तेपणाची भावना गेली. केवळ ईश्वरच आहे अशी प्रचीति आली. इतकीं वर्षें मी वर्ध्यांत नव्हे तर आपल्या आज्ञेंत राहिलों. या दुनियेंत तुमच्या आशीर्वादावांचून सारें शून्य आहे. "
>
> या पत्राला गांधीजींनी उत्तर लिहिलें, त्यांत म्हटलें आहे: " तुमची श्रद्धा, भक्ति पाहून डोळयांतून आनंदाचीं आंसवें झरूं लागतात. "

वर्ध्यापासून दीड मैलावर नालवाडी नांवाचें खेडें आहे. तिथली सर्व वस्ती हरिजनांचीच. तिथें जाऊन राहावें असें विनोबांनीं १९३३ सालीं ठरविलें. नवें तप तिथें सुरू करायचें

योजलें. नालवाडीला राहून गांव-सुधारणेचें काम त्यांनीं हातीं घेतलें. त्यांचे सहकारी अनेक होते. ते आसपासच्या गांवांतून हें काम करूं लागले. आपापले अनुभव कळवूं लागले. विनोबांकडून त्यांना सल्ला मिळे, सूचना मिळत, मार्गदर्शन होई. यांतूनच निरनिराळ्या विधायक कार्याच्या संस्था जन्माला आल्या. आपापल्यापरी काम करूं लागल्या.

इतक्यांत विनोबा खूप आजारी पडले. डॉक्टरांच्या ताब्यांत जाण्याचें, हवा पालटायला जाण्याचें त्यांनीं नाकारलें. ते स्वतःच स्वतःचे डॉक्टर बनले. पौनारच्या टेकडीवर ते जाऊन राहिले. खणण्याचा व्यायाम नियमितपणें घेऊं लागले. खाणेंपिणें बेताचें व योग्य तेंच ठेवलें. तीन महिन्यांत त्यांची तब्बेत सुधारली—औषधावांचून सुधारली. गांधीजींना त्यांनीं तसें वचन दिलें होतें. तें खरें करून दाखविलें. वर्ध्यापासून पांच मैलावर पौनार खेडें आहे. जवळून धाम नदी वाहते. या नदीकांठच्या टेकडीवर या आधुनिक ऋषीनें आश्रम स्थापला. त्याचें नांव ठेवलें ‘परंधाम.’ —थोर घर हा सामान्य अर्थ. भूदानाच्या पदयात्रेला ते इथूनच निघाले.

पौनारला आल्यानंतर त्यांनीं तिथें ‘परिश्रमालय’ चालू केलें. हा त्यांचा स्वावलंबी शेतीचा प्रयोग होता. त्यांत अनेक माणसें भाग घेऊं लागलीं.—पण पुन्हां विनोबा तिथूनहि निसटले.

“ठायीं ठायीं भजन लावी । आपण तेथूनि चुकावी ।। ”

हीच अशा निःस्पृहांची स्थिति. लोकांना दिशा दाखवावी. त्यांना मार्गावर आणावें.—एक काम वाटेला लावावें, आपण पुन्हां तिथून चालूं लागावें;—कशाचीहि अपेक्षा न धरतां, लोभ न बाळगतां. पुन्हां दुसरें काम हातीं घ्यावें. “चिंतनांतून प्रयोग व प्रयोगांतून चिंतन अशी माझी जीवनाची घडण बनली आहे. हिलाच मी ‘निदिध्यास’ म्हणतों. निदिध्यासांतून विचार स्फुरत राहातात.”—आणि आपले हेच विचार विनोबा प्रत्यक्ष कृतींत उतरवितात. प्रत्यक्ष व्यवहारांत आणतात. जें घडेल अशी

सामान्य लोकांना कल्पना नसते असें जगासमोर घडवून दाखवितात. उदाहरणानें उभें करतात.

विनोबांची ही साधना शांतपणें, गाजावाजा न करतां चालू होती. पण प्रत्यक्ष देशसेवेची संधि आली त्यालाहि ते तत्परच होते. १९२३ सालीं सरकारनें नागपूरला तिरंगी झेंड्याला बंदी केली. काँग्रेसनें हा तर राष्ट्रीय झेंडा मानलेला. त्याचा तो मान कायम राखण्यासाठीं मग तिथें सत्याग्रह सुरू झाला. तोच नागपूरचा झेंडा-सत्याग्रह. या सत्याग्रहाचीं सूत्रें हालविणारांत विनोबा प्रमुख होते. या सत्याग्रहांत त्यांना एका-वर्षाची शिक्षा झाली; पण तीन महिन्यांतच सरकारनें त्यांना सोडून दिलें. लगेच विनोबा वर्ध्याला परतले. पुन्हां परत तिथली सेवा-साधना चालू झाली.

पुढच्याच वर्षीं १९२४ सालीं गांधीजींनीं त्यांना आणखी एका कामगिरीवर पाठविलें. त्रावणकोर संस्थानांत गुरुवायूर या गांवीं हरिजनांचा मंदिर-प्रवेश सत्याग्रह व्हावयाचा ठरलें. त्या सत्याग्रहाचे संचालक म्हणून विनोबा तिकडे गेले.

१९३०--३१ च्या धामधुमींत अर्थातच ते मोकळे नव्हते. १९३२ मध्यें पुन्हां धरपकडीला सुरुवात झाली. आणि त्यांत सुरुवातीलाच विनोबांना धुळ्याच्या तुरुंगांत सरकारनें डांबलें. पण तिथें तरी ते स्वस्थ थोडेच बसणार ! स्वस्थ बसणें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. त्यांनीं दर रविवारीं गीतेवर प्रवचनें द्यायला सुरुवात केली. तींच ' गीताप्रवचनें ' म्हणून प्रसिद्ध आहेत.

आणि यानंतर आलें १९४० साल. दुसरें महायुद्ध सुरू झालेलें होतें. इंग्रजांना जर्मनांविरुद्ध लढतांना नाकीं दम येत होता. त्यासाठीं त्यांनीं हिंदुस्थानाला वेठीला धरलें. कारण हिंदुस्थान देश त्यांच्या सत्तेखालीं होता. गांधीजींना ही गोष्ट मुळींच पसंत नव्हती. इंग्रजांच्या स्वार्थासाठीं हिंदी लोकांचे बळी देणें, असा त्याचा सरळ अर्थ होता. गांधीजींनीं याला विरोध करण्याचें ठरविलें. इंग्रजांना युद्धाच्या कामीं लोकांनीं मदत करूं नये, असें

त्यांनीं सांगितलें. त्यासाठीं सत्याग्रह सुरू केला. परंतु हा सत्याग्रह सामुदायिक, अनेक लोकांचा नव्हता. तर वैयक्तिक, एकेका माणसाचा होता. त्यासाठीं माणसें फारच कशोशीनें निवडायचीं होतीं. कांहीं निवडक लोकांनाच या सत्याग्रहांत भाग घ्यायला गांधीजी सांगणार होते. त्यांपैकीं पहिला सत्याग्रही निवडला तो—विनोबा. विनोबांचीच आपण पहिली निवड कां केली याबद्दल गांधीजींनीं आपल्या 'हरिजन' पत्रांत एक मोठा लेख लिहिला. त्यांत विनोबांची जगाला ओळख करून दिली. आणि शेवटीं लिहिलें—" माझ्या आयुष्यांत स्वतः मी पुढाकार घेऊन चालविलेला सविनय कायदेभंगाचा ( सत्याग्रहाचा ) हा बहुतकरून शेवटचाच लढा. अर्थातच तो जास्तींत जास्त निर्दोष असावा अशी माझी इच्छा असणारच. शिवाय, काँग्रेसनें असें जाहीर केलेलें आहे कीं, सरकारला सतावण्याचे मार्ग असतील ते शक्य तों टाळण्याची आपली खटपट राहील. या कारणासाठींहि, मला सर्वांत उच्च दर्जाची निवड करण्याकरितां कोशीस करायलाच हवी होती. "—याचा अर्थ सरळ होता. तो असा कीं सत्याग्रह्याच्या ज्या ज्या म्हणून उच्च कसोटया असतील त्या विनोबा उत्तम प्रकारें उतरले होते. प्रत्यक्ष गांधीजींनींच त्यांना हें प्रमाणपत्र-दाखला-दिलें होतें. परंतु तोंपर्यंत मात्र विनोबांच्या या मोठेपणाची ओळख जगाला नव्हती.

अशा या सत्याग्रह्याला सरकारनें तीन वेळां तुरुंगांत डांबलें. पण विनोबांना तुरुंग आणि आश्रम सारखाच होता. तुरुंगांत असले तरी साधना चालायचीच—जशी आश्रमांत असे तशीच; अर्थात तुरुंगाचे नियम पाळून. शेवटच्या वेळीं १९४२ सालीं ते तुरुंगांत जाऊन पडले. आणि तीन वर्षेपर्यंत ते तिथेंच अडकून राहिले. पण त्यांनीं तुरुंगांतहि आपली शिकण्याची साधना आणि शिकवण्याची सेवा चालूच ठेवली.

मद्रास प्रांतांतील वेलोरच्या तुरुंगांत त्यांना पहिल्यानें ठेवलें. तिथल्या कैद्यांशीं मनमोकळें बोलतां यावें म्हणून तिकडील

सर्व भाषा ते शिकले—तेलगु, तामीळ, कानडी आणि मल्याळम्. वेलोरहून त्यांना नागपूरकडील शिवणीच्या तुरुंगांत आणलें. तिथेंहि पुन्हां त्यांची सेवा-साधना पूर्वीप्रमाणेंच चालू झाली. गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत स्थितप्रज्ञ माणूस कसा असतो तें सांगितलें आहे. त्याबद्दलचे १८ श्लोक आहेत. त्या प्रत्येक श्लोकावर वेगवेगळीं व्याख्यानें विनोबांनीं दिलीं. 'स्थितप्रज्ञ-दर्शन' या नांवाचें सुंदर पुस्तक त्यांतून जन्माला आलें.

१९४२ ची 'चले जाव' चळवळ झाली. विनोबांनीं सांगितलें—"आपण रामनामाप्रमाणें स्वतंत्र आहोंत" असें सांगा. ते पकडले गेले. परंतु १९४५ सालांत महायुद्ध संपत आलें. सत्याग्रही व पुढारीहि तुरुंगांतून सुटूं लागले. गांधीजी सुटले. विनोबांचीहि सुटका झाली. ते नागपूरवरून वर्ध्याला आले. त्यांनीं वाटेनें येतांना एक दृश्य पाहिलें—अनेक ठिकाणीं, गांवोगांवीं शौचाला बसलेल्या मंडळींचें दृश्य तें होतें. स्वच्छता, रीतभात, लाज, सभ्यपणा यांपैकीं कांहीं कांहींच या लोकांच्या असल्या वागण्यांत नव्हतें. स्वराज्य मिळविण्यासाठीं कसलीं माणसें तयार व्हावींत अशी विनोबांची इच्छा! आणि हें दृश्य कुणीकडे!

पीटर दि ग्रेट—थोर पीटर नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याची एक गोष्ट सांगतात. त्यानें दरबारच्या पहिल्याच दिवशीं एक हुकूम काढला.—'उद्यांपासून कोणीहि दाढी केल्याशिवाय दरबारांत यायचें नाहीं.' राजाच्या मंत्र्यांना आश्चर्य वाटलें. 'हा काय विचित्र हुकूम?' त्यांनीं विचारलें. 'राज्याच्या सुधारणेऐवजीं हे कसले हुकूम?' राजा उत्तरला, 'पहिल्यानें या लोकांना माणसें बनवतों. मग या माणसांची सुधारणा!' या गोष्टींतलें तात्पर्य इतकेंच कीं, साधी आपल्या शरिराची स्वच्छता ज्यांना कळत नाहीं त्यांना पुढलें काय समजणार!—विनोबांच्याहि असेंच मनांत आलें. ते पौनारच्या परंधाम आश्रमांत परत आले. त्यांनीं लगेच एक काम सुरू केलें. हातीं खराटा घेतला. सकाळीं

उठले, पौनारपासून २॥–३ मैलावर असलेल्या सुरगांव या खेड्यांत गेले. आणि त्यांनीं गांवचे संडास, गटारें साफ करायला सुरुवात केली. एक दिवस गेला, दोन दिवस गेले. सतत, दररोज, वेळेवर, कधींहि न चुकवतां ते असे एक वर्ष आणि आठ महिने सुरगांवला जात राहिले. तिथें भंगीकाम करीत राहिले. त्यांनीं स्वत: श्रमून लोकांना उदाहरण घालून दिलें.

लोकांवर परिणाम कांहीं झाला का ? किती झाला ? यावर विनोबांचें उत्तर आहे–" वीस वर्षांचें हें काम आहे. तोंवर आजची पिढी मोठी होईल." तोंपर्यंत काम करीत राहायला हवें असें विनोबांना वाटतें. वीस वर्षेंपर्यंत असें काम करीत राहिलें तर नवी पिढी सुधारेल अशी त्यांना आशा वाटते.

## सर्वोदयाची स्थापना

हा झाला विनोबांच्या दिवसभराच्या कामांतला बदल. पण याहिपेक्षां त्यांच्या विचारांत एक फार मोठा बदल झाला होता. ते वेलोर-शिवणीच्या तुरुंगांत होते. तिथें कम्युनिस्ट राजबंदीहि होते. इतरहि पक्षांचे कांहीं राजकीय कैदी होते. काँग्रेसचे तर होतेच. जगमित्र विनोबांनीं या सर्वांशीं संबंध ठेवला. परिचय वाढवला. त्यांचे विचार, अंत:करणें समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना असें आढळून आलें कीं, प्रत्येक पक्षांत बरी आणि वाईट दोन्ही प्रकारची मंडळी आहेत. प्रत्येक संस्थेंत कांहीं दुर्जन असले तरी सज्जनहि आहेतच. तेव्हां आपण एखाद्याच संस्थेचा अभिमान बाळगावा, एखाद्याच पक्षाचा अभिनिवेश धरावा हें बरोबर नाहीं. अहिंसाधर्मात याला स्थान नाहीं.

पटलें तसें वागायचें हा तर विनोबांचा बाणा. त्यांनीं लगेच गांधीजींना तसें बोलून दाखविलें. गांधीजींनीं ओळखलें कीं, हा प्रेमद्वेषाच्या पलीकडे गेलेला. आपला-परकेपणाचा बांध

ओलांडून गेलेला. याला कसलें संस्थेचें बंधन, कसली पक्षाची भित ! त्यांनीं विनोबांना अडविलें नाहीं. विनोबांनीं भराभर, आपणच वाढविलेल्या सर्व संस्थांचे राजिनामे दिले. आतां ते अगदीं फटिंग बनले. बायकामुलांच्या संसाराचा पाश नव्हताच. आतां संस्थांचींहि बंधनें उरलीं नाहींत.–हो, नाहीं म्हणायला एक सांसारिक पाश होता–वडिलांचा. पण १९४७ मध्यें तोहि धुळयाला तुटून गेला. वडील अत्यवस्थ स्थितींत धुळयाला होते. विनोबा त्यासाठीं धुळयाला आले. वडील वारले. नंतर कांहीं दिवस विनोबा धुळयालाच राहिले. स्वतःची बिघडलेली तब्बेत पुन्हां ताळयावर आणण्याचा त्यांचा तिथे बेत होता.

पण दैवानें कांहीं वेगळाच बेत रचला होता. १९४८च्या जानेवारींत विनोबा धुळयाला होते. जानेवारीच्या ३० तारखेला गांधीजींची दिल्लींत हत्या झाली. सारा देश हादरला. वर्ध्याला तर जबरदस्त धक्का बसला. सर्व विधायक कार्यकर्त्यांची बैठक वर्ध्याला फेब्रुवारी महिन्यांत ठरली होती. गांधीजींनींच ती योजली होती. गांधीजी गेले तरी ती भरली–पण मार्च महिन्यांत. त्या बैठकींतच 'सर्वोदय समाज' स्थापन झाला. विनोबांच्या प्रेरणेवरून, त्यांच्या सूचनेवरून. सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय, सर्वांचा विकास. 'सर्वोदय व्यवस्थेंत सर्वांना सारखें सुख, सर्वांच्या कर्तबगारीला सारखी संधि मिळेल.' असें विनोबांनीं सांगितलें आहे.

आतां संस्थेचा खुंट असा कांहीं उरलाच नव्हता. सर्वोदय समाज ही कांहीं एक संस्था नव्हती. तिच्यासाठीं एके ठिकाणीं मठ करून राहायची गरज नव्हती–विनोबांना वाटत नव्हती. म्हणून त्यांनीं देशयात्रा करायचें ठरविलें. फाळणीनंतर पाकिस्तानांतून हजारों मेयो मुसलमान भारतांत आले. त्यांना वसविण्याचें काम मोठें जिकिरीचें होऊन बसलें होतें. पंडित

नेहरूंनीं त्यासाठीं विनोबांना बोलावलें. विनोबांनीं दिल्लीला जाऊन तें पार पाडलें.

तेथून ते देशभर हिंडूं लागले. नवे विचार सांगूं लागले. नवें स्फुरण देऊं लागले.नवा उत्साह पेरूं लागले. पण ही देशयात्रा चालू असतांनाच ते आजारी पडले. आंतड्याचा विकार बळावल्यानें त्यांना पौनारला परतावें लागलें.

इथें कांहीं दिवस पुन्हां नव्या विचाराच्या चिंतनांत गेले. आणि पुन्हां नवा प्रयोग सुरू झाला. स्वावलंबी शेतीचा तो प्रयोग होता. कोणाला कांहीं सांगायचें तर आपण त्यासाठीं आधीं पुढें सरसावायचें—किंबहुना आपण करून दाखवायचें, लोकांनीं तें पाहून करूं लागायचें. "आधीं केलें मग सांगितलें।" असें रामदासस्वामींनीं म्हटलें आहे. तशी यांची पद्धत. त्याप्रमाणें ते रोज ८-८ तास शेतांत खपायला लागले. तोहि प्रयोग त्यांनीं यशस्वी केला. लोकांना आणखी एक धडा मिळाला.

पण हे लहानलहान धडे होते. साऱ्या देशभर एक मोठें कोडें पडलेलें होतें—तें कसें सोडवायचें हें कोणी सांगूं शकत नव्हता. कोणी शिकवूं शकत नव्हता. तें सोडवण्याचे धडे कोणाला देतां येत नव्हते. परंतु परमेश्वरानें त्यासाठीं विनोबांची योजना केली होती, असें दिसतें.

तेलंगणांत जाऊन भूदान-यज्ञाचा प्रारंभ करणें हीच ती योजना होती. केवळ लोकांचीं मनें वळवून, त्यांच्या मनांतला देव जागा करून, भूमीचें—जमिनीचें दान गरिबांसाठीं,भूमिदानासाठीं, जमीन नसलेल्यांसाठीं मिळविणें हा तो यज्ञ. त्या यज्ञाला तेलंगणांत १९५१ सालीं प्रारंभ झाला आहे. शंभर—हजार—लाख एकर अशा वाढत्या संख्येनें विनोबांना भूदान मिळालें व मिळतहि आहे. पण हे लाखांतलेहि आंकडे मोजून याचें महत्त्व नाहीं समजणार पूर्वी दगडासारख्या असलेल्या काळजांत-आपल्या देशबंधूंसाठीं थोडेंसुद्धां प्रेम नसलेल्या अंतःकरणांत—दुसऱ्याला

देण्याच्या भावनेचा पाझर फुटला हेंच महत्त्वाचें आहे. कारण जशी बंदूक लढत नाहीं किंवा तो धरणारा हातहि लढत नाहीं तर त्यामागील मन लढत असतें. तसेंच सेवा केवळ पैसा किंवा जमीन करीत नाहीं. ती जवळ बाळगणाराच्या, ती धारण करणाराच्या अंत:करणांतच सेवेचा प्रकाश फांकावा लागतो. मग तें अंत:करण वाटेल ती सेवा करूं शकतें, सेवा देऊं शकतें. या अंत:करणांत सेवावृत्तीचा प्रकाश पाडणारें विनोबांचें काम हेंच त्यांचें खरें काम. विनोबांच्या भूदान-यज्ञाच्या पदयात्रांतून हा प्रकाश आतां देशभर फांकूं लागला आहे. या प्रकाशांत विनोबांचें मोठेंपण आपण आज पाहात आहोंत.



ज्याला वाचतां येतें, त्याला शिकतां येतें.
ज्याला शिकतां येतें, त्याला सुधारतां येतें.
म्हणून, वाचा–शिका नि सुधारा.
तें वाचावें–कीं जें मनाला वाईट वागण्यापासून वांचवील.
असें शिकावें–कीं जें माणसाला भला माणूस बनवील.
इतकें सुधारावें–कीं जें इतरांना उदाहरण म्हणून होईल.

++++++

आमची ही लोक-शिक्षण माला
या उद्देशानेंच सुरू झाली आहे.

++++++

'लोक-शिक्षण मालेचीं'
हीं अभिनव बोधक पुस्तकें

- तीन कथा—६२ नये पैसे
- श्रीरामदासस्वामी म्हणतात—५० नये पैसे

या मालेंतील
पुढील पुस्तकें
ल व क र च
प्रसिद्ध होतील.

IRBK-0106241

IRBK-0106241

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राऊंड बिल्डिग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.